# महिला व बाल विकास विभाग रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

**१ एप्रिल २०२३ रोजी व त्या नंतर जन्माला येणाऱ्या मुलींसाठी लेक लाडकी योजना**

## लेक लाडकी योजना



महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक एबावि २०२२/प्र. क्र.२५१/ का.६ दि.३० ऑक्टोबर २०२३

## योजनेची उद्दिष्टे

- मुलींच्या जन्मास प्रोत्साहन देऊन मुलींचा जन्मदर वाढवणे
- मुलींच्या शिक्षणास चालना देणे
- मुलींचा मृत्युदर कमी करणे व बालविवाह रोखणे
- शाळाबाह्य प्रमाण ० (शुन्य) वर आणण्यासाठी प्रोत्साहित करणे
- कुपोषण कमी करणे



### योजनेचा लाभ ५ टप्प्यात देण्यात येईल

१) मुलीचा जन्म झाल्यावर रु.५,०००/-

२) मुलगी पहिलीत गेल्यावर रु.६,०००/-

३) मुलगी सहावीत गेल्यावर रु.७,०००/-

४) मुलगी अकरावीत गेल्यावर रु.८,०००/-

५) मुलीला अठरा वर्ष पूर्ण झाल्यावर रु.७५,०००/-

एकूण लाभ रु.१,०१,०००/-

### अटी व शर्ती

- कुटुंबाचे पिवळे व केशरी शिधापत्रिका आवश्यक
- दिनांक १ एप्रिल,२०२३ रोजी व त्यानंतर जन्माला येणाऱ्या एक अथवा दोन मुलींना लागू राहील. तसेच, एक मुलगा व एक मुलगी असल्यास मुलीला लागू राहील.
- पहिल्या अपत्यास तिसऱ्या हप्त्यासाठी व दुसऱ्या अपत्याच्या दुसऱ्या हप्त्यासाठी अर्ज सादर करते वेळी माता/पित्याने कुटुंब नियोजन प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.
- तसेच, दुसऱ्या प्रसुतीच्या वेळी जुळी अपत्य जन्माला आल्यास एक मुलगी किंवा दोन्ही मुलींना या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील. मात्र त्यानंतर माता/पित्याने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणे आवश्यक राहील.
- दि. १ एप्रिल २०२३ पूर्वी एक मुलगी/मुलगा आहे व त्यानंतर जन्माला आलेल्या दुसऱ्या मुलीस किंवा जुळ्या मुलींना (स्वतंत्र) ही योजना अनुज्ञेय राहील. मात्र त्यानंतर माता/पित्याने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणे आवश्यक राहील.
- लाभार्थीचे कुटुंब महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असणे आवश्यक राहील.
- लाभार्थी कुटुंबाचे वार्षीक उत्पन्न रक्कम रु. १ लाखा पेक्षा जास्त नसावे.

### आवश्यक कागदपत्रे

- लाभार्थी जन्माचा दाखला
- कुटुंबप्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला (वार्षीक उत्पन्न १ लाखपेक्षा जास्त नसावे.) याबाबत तहसिलदार / सक्षम अधिकारी यांचा दाखला आवश्यक राहील.
- लाभार्थीचे आधारकार्ड (प्रथम लाभावेळी ही अट शिथिल राहील)
- पालकाचे आधारकार्ड
- लाभार्थी व माता यांचे संयुक्त बँकखात्याच्या पासबुकच्या पहिल्या पानांची छायांकित प्रत
- रेशनकार्ड (पिवळे अथवा केशरी रेशनकार्ड साक्षांकित प्रत)
- अंतिम लाभा करीता मुलीचा विवाह झालेला नसणे आवश्यक राहील.



## अधिक माहिती करीता संपर्क

रायगड जिल्हातील सर्व एकात्मिक बालविकास सेवा योजना कार्यालय,
अंगणवाडी सेविका व पर्यवेक्षिका



**लेक वाचवा, लेक वाढवा, लेक घडवा.**

# रायगड जिल्हा परिषद, अलिबाग
# महिला व बाल विकास विभाग

### उद्देश:

- गरोदरपणात आणि बाळंतपणात महिलांना आरोग्य सेवा-सुविधा आणि प्रोत्साहनाच्या माध्यमातून कुपोषणाचा प्रभाव कमी करणे.
- माता व बाल आरोग्य सुधारणे.

### लाभाचे स्वरूप:

| टप्पा | अट | पहिल्या अपत्यासाठी | दुसरे अपत्य मुलगी असल्यास तिच्या जन्मानंतर |
|---|---|---|---|
| पहिला हप्ता | राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या शासकीय आरोग्य केंद्रात गर्भधारणेची नोंदणी आणि शेवटच्या मासिक पाळीच्या तारखेपासून ६ महिन्यांच्या आत किमान एक प्रसूतीपूर्व तपासणी झालेली असावी. | रु.३०००/- | एकत्रित रु.६०००/- जन्म दाखला असणे आवश्यक व बालकाचे पेंटा ३ पर्यंतचे (१४ आठवडे) लसीकरण झालेले असणे आवश्यक |
| दुसरा हप्ता | I. बाळाची जन्म नोंदणी<br>II. बालकास बीसीजी, ओपीव्हीझीरो, ओपीव्ही ३ मात्रा, पेन्टाव्हॅलेन्ट लसीच्या ३ मात्रा अथवा समतुल्य / पर्यायी लसीकरणाचे प्राथमिक चक्र पूर्ण करणे आवश्यक. | रु. २०००/- | |



### पात्र लाभार्थी:

- पहिले बाळ मुलगा किंवा मुलगी असलेली व दुसरे बाळ मुलगी असलेली महिला जी खालीलपैकी कोणत्याही एका निकषात बसत असेल अशी महिला पात्र आहे.

### निकष

१) ज्या महिलांचे निव्वळ कौटुंबिक उत्पन्न प्रतिवर्ष रु. ८ लाखापेक्षा कमी आहे.

२) अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या महिला.

३) पात्र लाभार्थी ज्यांच्याकडे राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्याअंतर्गत रेशन कार्ड उपलब्ध आहे.

४) ज्या महिला अंशतः (४० टक्के) किंवा पूर्ण अपंग आहेत (दिव्यांग जन)

५) बी.पी.एल. रेशनकार्ड असलेली महिला.

६) प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत महिला लाभार्थी.

७) ई- श्रम कार्ड असलेली महिला,

८) किसान सन्मान निधी अंतर्गत लाभार्थी महिला शेतकरी

९) मनरेगा जॉब कार्ड असलेली महिला.

१०) अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस, आशा सेविका

### आवश्यक कागदपत्रे:

- लाभार्थीचे आधार कार्ड
- गरोदरपणाचे नोंदणीचे कार्ड, बाळाचे लसीकरण कार्ड
- लाभार्थीचे आधार कार्ड जोडलेले व DBT स्नेही बँक खाते



### माहिती, अर्ज व मदतीसाठी संपर्क:

- आपल्या जवळच्या अंगणवाडी परेवेक्षिका व सेविका, यांच्याशी संपर्क साधा.
- अधिक माहितीसाठी १४४०८ या टोल फ्री हेल्पलाईन क्रमांकावर फोन करा.
- लाभार्थी https://pmmvy.wcd.gov.in/ या ऑनलाईन पोर्टलवर नोंदणी करु शकता.